# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

जा.क्र.: एएक्ससी-२१/डी-३(एच) दिनांक:२७.१२.२०१६

## सूचनापत्र

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्र.का-२०/१८०/१९.८.१४, दि.१९.८.२०१४ अनूसार **पदव्यूत्तर** अभ्यासक्रमामध्ये संबंधीत विद्याशाखेत एकदाही अनुत्तीर्ण न होता सर्वात जास्त गुण (सीजीपीए) घेईल त्या उत्तीर्ण विद्यार्थ्यास विद्यापीठ स्तरावर सुवर्ण पदक (सुवर्ण मुलामित) व गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिलेली आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात **सन २०१४-१५** या शैक्षणिक वर्षामध्ये खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थी विविध **पदव्यूत्तर** अभ्यासक्रमाच्या विद्याशाखेत विद्यापीठ स्तरावर सुवर्ण पदक (सुवर्ण मुलामित) व गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यास पात्र ठरत आहेत.

| अ. क्र. | विद्याशाखा | नोंदणी क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त गुण (सीजीपीए) | श्रेणी | महाविद्यालयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि | २०१३ए/०१ एमएल | बी. विभजम सगल किरण | ९.३१ | प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह | कृषि महाविद्यालय, लातूर |
| २ | कृषि अन्नतंत्र | २०१३टी/१५ एम | प्रशांत साहनी | ९.१८ | प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह | अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी |
| ३ | कृषि अभियांत्रिकी | २०१३एई/१३ एम | तरटे सूर्यकांत बाजीराव | ८.४९ | प्रथम श्रेणी | कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी |
| ४ | गृहविज्ञान | २०१३एच/०३ एम | रुपनर प्रिती लक्ष्मणराव | ८.५५ | प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह | गृहविज्ञान महाविद्यालय, परभणी |
| ५ | उद्यानविद्या | २०१३एच/०६ एमएल | सनवर मल चौधरी | ८.६९ | प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह | कृषि महाविद्यालय, लातूर |
| ६ | कृषि जैवतत्रज्ञान | २०१३बीटी/ ०८ एमएल | हिंगे पल्लवी रंगनाथ | ९.०७ | प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह | विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर |
| ७ | कृषि व्यवसाय व्यवस्थापन | २०१३एमबीए/ १८एमसी | काळे प्रणिल सुनिल | ८.६३ | प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह | पदव्यूत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्था, चाकूर जि. लातूर |

वरील सुवर्ण पदके (सुवर्ण मुलामित) २१ व्या दीक्षांत समारंभात विजेत्यांना प्रदान करण्यात येतील, कृपया याची नोंद घ्यावी.

मा. कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने.

कुलसचिव

**प्रतिलिपीः**

१ संचालक शिक्षण व अधिष्ठाता (कृषि) / संचालक संशोधन / संचालक विस्तार शिक्षण / विद्यार्थी कल्याण अधिकारी, वनामकृवि, परभणी.

२ सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य, सर्व शासकीय महाविद्यालये अंतर्गत वनामकृवि, परभणी, यांना देवून विनंती करण्यांत येते की,उपरोक्त सूचनापत्र महाविद्यालयाच्या सूचना फलकावर लावून सर्व स्नातकांच्या निदर्शनास आणावे व **सूचना पत्राबद्दल स्नातकांचे कांही आक्षेप असल्यास (८) दिवसात आपल्या अभिप्रायासह या कार्यालयास पूढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावेत. तसेच आपल्या महाविद्यालयाशी संबंधीत पारितोषिक विजेत्या स्नातकांना २१ व्या दीक्षांत समारंभात पारितोषिक स्विकारण्यासाठी स्वखर्चाने उपस्थित रहाण्यासाठी आपल्या स्तरावरून कळविण्यात यावे व त्याची एक प्रत विद्यापीठास पाठवावी.**

३ नियंत्रक, वनामकृवि, परभणी.

**प्रतः**

१. मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वनामकृवि, परभणी.

२ **डी-४, अ-१, ब (निकाल शाखा), विद्या विभाग, कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी यांना देण्यात येवून कळविण्यात येते की, उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या विद्यार्थ्यांचे प्राप्त गुण (सीजीपीए) इत्यादीं बाबत तसेच उपरोक्त विद्यार्थ्यांशिवाय सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये जास्त प्राप्त गुण (सीजीपीए) विद्यार्थी नाहीत याचीही खात्री/तपासणी आपले शाखेतील निकालासंबंधीच्या मूळ अभिलेख्यांवरुन करावी व त्यात काही सुधारणा/बदल असल्यास त्या प्रमाणे विद्या विभागातील डी-३(एच) (उच्चस्तर शिक्षण) शाखेस (८) दिवसाच्या आत कळवावे, नसता उपरोक्त माहिती बरोबर आहे असे गृहीत धरुन विद्यापीठ स्तरावर सुवर्ण पदक (सुवर्ण मुलामित) व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.**

३ **प्रभारी अधिकारी**, मध्यवर्ती संगणक केंद्र, वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील सूचनापत्र विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावे.

४ सूचना फलक, प्रशासकीय इमारत / विद्यापीठ ग्रंथालय, वनामकृवि, परभणी.